▌चित्रपट▌

पिंजरा : एक वाचन

संजय मेणसे

मराठी चित्रपट आणि तमाशा यांचं नातं आगळंच आहे. तमाशा या कलाप्रकाराचा महाराष्ट्रावर विशेषत: महाराष्ट्रातील ग्रामीण समाजावर इतका प्रभाव होता की, अगदी अलीकडेपर्यंत मराठी चित्रपट तमाशा किंवा लावणीशिवाय पूर्ण होत नसे. तमाशा चित्रपट किंवा तमाशा प्रधान चित्रपट हा एक वेगळा चित्रपट प्रकार (जॉनर) मराठी चित्रपट सृष्टीत जन्माला आला, तो या प्रभावातूनच. अनेक लहानथोर दिग्दर्शकांनी असंख्य तमाशा चित्रपट बनवले. अनेक कलावंत या माध्यमातून मोठे झाले. या तमाशा चित्रपटांनी एक काळ गाजवला होता. सर्वात अलीकडचा गांजलेला तमाशा चित्रपट म्हणजे नटरंग.

या साऱ्या तमाशा चित्रपटांचा मुकुटमणी म्हणजे भारतातील जेष्ठ आणि श्रेष्ठ निर्माते/दिग्दर्शक व्ही. शांताराम यानी १९७२ साली बनवलेला 'पिंजरा' असे मानले जाते. अनेक अर्थानी 'पिंजरा' वैशिष्ट्यपूर्ण होता. हा मराठीतील पहिला रंगीत चित्रपट. महाराष्ट्रातील सर्वश्रेष्ठ रंगकर्मी डॉ. श्रीराम लागू यांचा हा पहिलाच चित्रपट. जेष्ठ संगीतकार राम कदम यांचं सर्वोत्कृष्ट संगीत पिंजराचंच. यातील गाणी आजही ऐकली जातात. सुप्रसिद्ध गीतकार जगदीश खेबुडकर यांच्या सर्वोत्कृष्ट गीतरचना पिंजरामधीलच. तमाशा चित्रपटांचे अग्रणी अनंत माने यांची कथा-पटकथा, तर लोकप्रिय ग्रामीण साहित्यिक शंकर पाटील यांचे संवाद पिंजराला लाभले होते. तांत्रिकदृष्ट्या पिंजरा कोणत्याही हिंदी चित्रपटाइतकाच उजवा होता. शांतारामबापूंचा हा शेवटचा मोठा चित्रपट. समीक्षकांनी गौरवलेला हा चित्रपट. मराठीतील सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे १९७२ सालचे नॅशनल अॅवॉर्ड पिंजराला मिळाले होते. पिंजराने प्रचंड व्यावसायिक यश मिळवले. पुण्यात पिंजरा १३४ आठवडे चालला. अनेक गावांत तो २५ ते ५० आठवडेही चालला. प्रस्तुत लेखकाला आठवतं की, त्याच्या जन्मगावी एका माणसानं पिंजरा १८ वेळा पाहिला होता. पिंजरा निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ तमाशा चित्रपट मानला जातो, तसेच मराठीतील एक उत्कृष्ट चित्रपट म्हणून ओळखला जातो.

पिंजरा २०१६ साली पुन्हा प्रदर्शित करण्यात आला. तरुण पिढीचे सिनेअभ्यासक गणेश मतकरी पिंजराबद्दल खूप आदराने लिहितात - अजरामर क्लासिक असं काही (सिनेमात) नसतं, पण पिंजरा हा कुणीही चुकवू नये असं खरंखुरं (बोनाफाइड)

लेखक पुणेस्थित कार्यरत वकील आहेत.
ईमेल- sanjaymense@gmail.com

क्लासिक आहे. म्हणजेच पिंजरा चित्रपटाचं गारूड कायम आहे.

पिंजरा चित्रपटाच्या तांत्रिक बाजू, संगीत, अभिनय, छायाचित्रण वगैरे सर्व बाबी परिपूर्णच आहेत असे मान्य करून या लेखात आपल्याला विचार करायचा आहे, तो मुख्यत: या चित्रपटाचे कथानक आणि व्यक्तिरेखा यांचा; तोही एका वेगळ्या सामाजिक दृष्टिकोनातून!

उरले नव्हते.

व्ही. शांताराम यांना नेमकं काय सांगायचं आहे?

मुळात पिंजरा ही एक शोकांतिका आहे, एका आदर्शवादी माणसाची. या चित्रपटाची नेमकी नस पकडली आहे गीतकार जगदीश खेबुडकर यानी या चित्रपटातील शेवटच्या 'कशी नशीबानं थट्टा आज मांडली' या गाण्यात. गुरूजीना सक्तीनं हातात तुणतुणं देऊन तमाशाच्या बोर्डावर उभं केलं जातं, त्यावेळी

या चित्रपटाच्या कथानकाचा गोषवारा डॉ. श्रीराम लागू यांनी आपल्या लमाण या आत्मचरित्रात मोजक्या शब्दात दिला आहे. ते सांगतात : एक चांगला तिशी-पस्तिशीचा, ब्रम्हचर्य हेच जीवन वगैरे मानणारा, आदर्शवादी, समाजसुधारक असलेला एक माणूस, स्त्री-मोहात पडल्यामुळे जीवनात कसा उद्‌ध्वस्त होतो ह्याचीच गोष्ट म्हणजे पिंजरा. ते पुढे असंही सांगतात की, इतकी छान कथा-पटकथा-संवाद, शांताराम बापूंसारखा जगप्रसिध्द दिग्दर्शक, राजकमल सारखी जगन्मान्य चित्रपट-संस्था एवढे सारे एकत्र झाल्यावर मला (या चित्रपटाला) नकार देण्याचे काही कारणच

त्यांच्या तोंडी असलेलं हे गाणं या चित्रपटाचा क्लायमॅक्स आहे. पिंजराचे दिग्दर्शक व्ही. शांताराम हे गाण्यांच्या निवडीच्या बाबतीत अतिशय चोखंदळ होते. असे म्हणतात की, खेबुडकरांनी या चित्रपटातील गाण्याच्या एकेक प्रसंगासाठी अनेक गाणी रचली होती. यातून शांतारामबापूनी नेमकी गाणी निवडली. हे गाणंही याला अपवाद नाही. विलक्षण प्रभावी अशी ही गीतरचना स्वयं-स्पष्टीकरणात्मक (self explanatory) आहे. हा चित्रपट समजून घेण्यासाठी जिज्ञासूनी हे गीत मुळातूनच ऐकायला हवं.

तेव्हा या चित्रपटाचं सार काय सांगता येईल?

तर, कितीही चारित्र्यवान, सदाचारी, सभ्य, सरळमार्गी पुरुष - एकदा का बाईच्या नादी लागला की, त्याची अधोगती टळत नाही; त्याची नैतिकता, निर्धार, विवेकबुद्धी, आदर्श सारे कुचकामी ठरतात. किंवा उलट्या बाजूने विचार करता, एखाद्या बाईने निश्चय केला, तर ती कोणाही चारित्र्यवान, सदाचारी, सभ्य, सरळमार्गी पुरुषाचं वाटोळं करू शकते. अगदी त्याच्या हाती तुणतुणं देऊन त्याला तमाशाच्या बोर्डावरही उभी करू शकते.

गुरुजी या चित्रपटाचे नायक असतील, पण चंद्रकला ही पूर्णार्थाने चित्रपटाची नायिका आहे का? तर नाही. नायिकेपेक्षा ती खलनायिकाच जास्त आहे. ती गुरुजींच्या अधोगतीस कारणीभूत आहे. आणि त्याची शिक्षाही तिला या चित्रपटात मिळते. तिची वाचा जाते आणि बेवारस मृत्यू येतो. हा गुरुजींच्या मनाचा मोठेपणाच की, तिच्या शवाला ते स्वत:च्या रक्ताचा टिळा लावतात.

जेष्ठ रंगकर्मी अतुल पेठे पिंजरा चित्रपटाबद्दल साधना साप्ताहिकाच्या मला प्रभावित करून गेलेला सिनेमा या विशेषांकातील त्यांच्या लेखात लिहितात की, आदर्शवादी सत्त्वशील गुरुजींचा तमाशातला मास्तर कसा होतो याची ही कहाणी आहे. ते पुढे असेही लिहितात, या चित्रपटाने मला कोणाही पुरुषाचे आणि बाईचे कधीही आणि काहीही होऊ शकते याचे भान दिले. हा चित्रपट पाहाणाऱ्या प्रत्येकाला स्वत:च्या आयुष्याशी आयडेंटीफाय करावासा वाटतो. चांगल्या कलाकृती आपल्या जगण्यातून उगवतात आणि जगताना आठवतात त्या अशा.

एकंदरीत गेली जवळजवळ पाच दशकं पिंजरा चित्रपट जसा सर्वसामान्य लोकांनी डोक्यावर घेतला, तसाच समीक्षकांनीही त्याला उचलून धरलं. असं भाग्य खूप कमी चित्रपटांना लाभतं.

परंतु हा चित्रपट स्वतंत्र नाही. तो 'द ब्ल्यू एंजल' या एका सुप्रसिद्ध जर्मन चित्रपटावर आधारित आहे, हे खूप कमी लोकांना ठाऊक असतं. पिंजराच्या श्रेयनामावलीत 'द ब्ल्यू एंजलचा' उल्लेख नाही. (पिंजराच्या कथानकाचा काही भाग नोरा प्रेंटीस या अमेरिकन चित्रपटावरही बेतलेला आहे. याही चित्रपटाचा पिंजराच्या श्रेयनामावलीत उल्लेख नाही. असो)

द ब्ल्यू एंजल आणि पिंजरा

द ब्ल्यू एंजल हा सन १९३०चा पहिला बोलका जर्मन चित्रपट. याचे दिग्दर्शक जोसेफ वॉन स्टर्नबर्ग. हेन्री मान यांच्या १९०५ सालातील कादंबरीवर आधारित. याचा नायक आहे एक प्रोफेसर - इमॅन्युएल राथ. हा सीधासाधा मध्यमवर्गीय आणि मध्यमवयीन माणूस. पिंजरातील गुरुजींसारखा आदर्शवादी वगैरे नाही. पण युरोपातील कोणत्याही प्राध्यापकाप्रमाणे समाजात आदरणीय. हाही अविवाहित. वर्गातील विद्यार्थ्यांशी हुकूमशाही पद्धतीने वागणारा. बराचसा एककल्ली. हा गावातील द ब्ल्यू एंजल या कॅब्रे गृहात नव्याने आलेल्या

नाट्यपथकातील लोला या नर्तिकेच्या प्रेमात पडतो. एक रात्र तिच्यासोबत काढतो. यावरून दुसऱ्या दिवशी त्याचे विद्यार्थी वर्गात प्रचंड दंगा करतात. प्राचार्य त्याला कामावरुन काढून टाकतात. पण लोलाच्या प्रेमात पडलेला राथ तिला लग्नाची मागणी घालतो. त्या वेळी लोला चक्क खदाखदा हसते. पण लग्नाला तयार होते. त्यांचं लग्न होतं. नोकरी गमावलेला राथ स्वमर्जीने लोलासोबत तिच्या कॅब्रे पथकासोबत राहायला येतो.

या ठिकाणी द ब्ल्यू एंजलमधील मुक्त समाजरचना आणि पिंजरातील जातिग्रस्त समाजरचना यातील फरक ध्यानात घ्यावा लागेल. आपण चंद्रकलेच्या प्रेमात पडलो आहोत, हेच मुळी पिंजरातील गुरुजी स्वीकारायला तयार नाहीत. आपल्या देशात आंतरजातीय लग्नालाच नाही, तर आंतरजातीय प्रेमालाही बंदी असते. ही जातिबंधनं आदर्श मानल्यामुळे आपल्या आदर्श गुरुजींना ती मोडावीशी वाटत नाहीत. जर्मनीतील राथसमोर वा लोलासमोर असं कोणतंही बंधन नाही. दडपण तर नाहीच नाही!

प्रोफेसर राथपाशी कॅब्रे पथकामध्ये काम करण्यासाठीचे कोणतेच कसब नाही आणि त्याच्या शिक्षणाचा कॅब्रे पथकात उपयोग नाही. त्यामुळे तो सुरुवातीला लोलाची उत्तान छबी असलेले फोटो प्रेक्षकांना विकण्याचे काम करू लागतो. हळूहळू तो त्याच पथकात विदुषकाचे काम करू लागतो. पूर्वीचा सारा ताठा, आत्माभिमान, आदर गमावून बसतो, सारे त्याला तुच्छतेनं वागवू लागतात. लोलाही त्याच्याशी अलिप्तपणे वागू लागते. अखेरीस हे कॅब्रे पथक परत एकदा त्याच्या मूळ गावी येते. प्रोफेसर राथ विदुषकाचे काम करणार असल्याची मोठी जाहिरात केली जाते. गावातील लोक खेळ पहाण्यासाठी गर्दी करतात. रंगमंचावर राथचा खूप अपमान होतो. त्याच रात्री लोला आणि एक श्रीमंत परिचित चुंबन घेत असताना राथ पहातो. रागानं वेडापिसा झालेला राथ लोलाचा गळा दाबून तिचा जीव घ्यायचा प्रयत्न करतो. पण लोक त्याला पकडून बांधून ठेवतात. खचलेला राथ मध्यरात्री आपल्या जुन्या कॉलेजात येतो, आपल्या वर्गात जातो. खुर्चीत बसतो, टेबलावर डोकं ठेवून प्राण सोडतो.

द ब्ल्यू एंजल ही प्रोफेसर राथ याची शोकांतिका निश्चित आहे. पण तो स्वत:च या शोकांतिकेचा कर्ता आहे. लोलाशी लग्न करण्याचा निर्णय त्याचा होता आणि तिच्या कॅब्रे पथकासोबत राहाण्याचा निर्णय ही त्याचाच होता. आपले शिक्षण, समाजातले स्थान वगैरेचा उपयोग करून तो आपली पत्नी लोला हिला एक सन्माननीय जीवन देऊ शकला असता. हे त्यानं केलं नाही, करायचा प्रयत्नही केला नाही, हेच त्याच्या शोकांतिकेचं मूळ नाही का?

पिंजरामध्ये बरोबर उलटं घडतं. तमासगीर चंद्रकला आदर्श बाण्याच्या गुरुजींना आपल्या मोहात पाडते आणि अखेरीस अधोगतीस पोहोचवते. गुरुजी स्वतःच्या खूनाच्या आरोपावरून स्वत:च फाशी जातात. गुरुजीना ब्राह्मण दाखवल्यावर चंद्रकलेला खलनायिका म्हणूनच प्रोजेक्ट करणं शांतारामबापूंना व्यवसायाच्या दृष्टीने आवश्यक होतं का? प्रोफेसर राथ याची शोकांतिका तटस्थपणे मांडणारा मुक्त समाजातील जोसेफ वॉन स्टर्नबर्ग आणि गुरुजींच्या शोकांतिकेसाठी चंद्रकलेला जबाबदार धरून उघडपणे पक्षपात करणारे जातिग्रस्त समाजातील शांतारामबापू! का तुलना करू नये या दोघांची, दोन्ही समाजांची? का पाहू नये पिंजरा चित्रपटाकडे सामाजिक दृष्टिकोनातून?

सामाजिक दृष्टिकोनातून दिसणारा पिंजरा

पिंजरा भले नामवंतांनी गाजवलेला असला आणि थोरामोठ्यांनी नावाजलेला असला, तरी आपण या चित्रपटाचा सामाजिक अंगानं निश्चितपणे विचार करायला हवा-जो बहुदा आजपर्यंत मराठीत तरी झालेला नाही.

हा चित्रपट स्त्रियांबाबत आपल्याला कोणता संदेश देतो? किंवा चंद्रकला आणि तिची मोठी बहीण आक्का यांच्या व्यक्तिचित्रणातून स्त्रियांबद्दल हा चित्रपट आपल्याला सर्वसाधारणपणे काय सांगतो? तमासगीर मंडळींच्या जीवनाचं या चित्रपटात झालेलं चित्रण वास्तवाला धरून आहे का? हे आणि असे अनेक प्रश्न आपल्याला पडले का? नसतील पडले तर का नाही पडले? पिंजराचं गारूड आपण आपल्या स्वतंत्र बुद्धीने समजून आणि पारखून घ्यायला हवं की नको?

हा चित्रपट स्त्रियांविषयी कांही विशिष्ट संदेश देतो. जसे की :

स्त्रिया सूडबुद्धीच्या असतात. त्या डूख धरून सूड घेतात. क्लायमॅक्सच्या गाण्यात चंद्रकलेचा उल्लेख मेनका, नार, नागीण असा केला आहे..

स्त्रिया खोटं बोलून, खोटं वागून पुरुषांना भुलवतात. नादी लावतात. चंद्रकला गुरुजीना नादी लावतेच; पण तिची मोठी बहीण आक्का हिनंही एका चांगल्या संसारी माणसाला (सरकार-निळू फुले) नादी लावलं-आणि तो आपली बायको-मुलं, घरदार सोडून याच तमाशात दाखल झाला आणि शेवटी तिथंच सोंगाड्याचं काम करू लागला. सतत लाचार हसत राहून लाजीरवाणं जिणं सहन करू लागला.

स्त्रियांना नीतिमत्तेची चाड नसते. एखादा पुरुष आवडला की, त्या त्याला वश करायच्या मागे लागतात. कोणताही सारासार विचार न करता.

गुरुजींसारखा कोणताही भले कितीही सज्जन, सत्त्वशील आणि आदर्श पुरुष जर एकदा का स्त्रीच्या नादी लागला की, त्याचं अध:पतन होतंच होतं..

स्त्रिया धोकादायक असतात. शहाण्या माणसानं त्यांच्यापासून दूर राहावं. दूर रहाणं शक्य नसेल, तर निदान त्यांना ताब्यात ठेवावं. त्यांना योग्य जागीच ठेवावं. स्त्रियांना शक्यतो स्वातंत्र्य देऊ नये, किंवा फाजील स्वातंत्र्य तर अजिबात देऊ नये. स्त्रियांच्या आहारी जाऊ नये...वगैरे वगैरे.

स्त्रियांबाबतची ही सारी मांडणी थोडीशी परिचयाची वाटते का? किमान सामाजिक जाणिवा असलेल्या प्रत्येकाला ही मांडणी नक्की ओळखीची वाटेल. या आशयाचे सारे विचार किंवा अविचार मनुस्मृतीतील आहेत. पिंजरा चित्रपट मनुस्मृतीशी सुसंगत आहे असे म्हणायचे का? हे सारे काय गौडबंगाल आहे?

सनातनी/ ब्राह्मणी प्रभाव ?

पिंजरासारखा मराठीतील अभिजात वगैरे समजला जाणारा, थोरामोठ्यानी नावाजलेला शांताराम बापूनी बनवलेला चित्रपट अंतिमत: प्रेक्षकांवर अतिशय प्रतिगामी, सनातनी, विषमतावादी, ब्राह्मणी प्रभाव टाकत असेल, तर या चित्रपटाचा परामर्श आपण या अंगानं का घेऊ नये? हा चित्रपट आपण आंधळेपणानं स्वीकारायच्या ऐवजी डोळसपणे वेगळ्या सामाजिक दृष्टिकोनातून का तपासू नये?

गुरुजी या व्यक्तिरेखेपासूनच सुरुवात करू :

गुरुजी केवळ ब्रम्हचारी आहेत, म्हणून ते आदर्श आणि सदाचारी ठरतात का? एखाद्यानं ब्रम्हचारी वा अविवाहित असणं ही त्या व्यक्तीची सर्वस्वी व्यक्तिगत निवड असते. तो त्या तिचा खाजगी निर्णय असतो. तो सर्व समाजाने आदर्श मानायचे कारण नाही. ब्रम्हचारी असणं म्हणजे स्त्रीपासून दूर राहाणं. ब्रम्हचारी पुरुषाला आदर्श मानायचं याचा एक अर्थ म्हणजे स्त्री मूलत: अपवित्र आणि पापी असते याला मान्यता देणं. कन्हैयाकुमार एका मुलाखतीत म्हणतात त्याप्रमाणे-

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ ब्रम्हचारी वा अविवाहित आहेत. त्यामुळे ते भ्रष्टाचार करणारच नाहीत असं म्हणणं, म्हणजे स्त्रीच्या संगतीत पुरुष भ्रष्टाचारी बनतो हे मान्य करणं नाही काय? हा स्त्रियांचा अपमान नाही काय? द ब्ल्यू एंजलमध्ये प्रोफेसर राथला समाजात मान आहे तो राथ हा प्राध्यापक असल्यामुळे, ब्रम्हचारी असल्यामुळे नव्हे!

शाळेच्या वर्गाची सुरुवात हे गुरुजी ब्रम्हचर्य हेच जीवन या वाक्याने करतात. हे बरोबर, योग्य किंवा शास्त्रीय आहे का? स्त्री-पुरुष संबंध कसे निकोप आणि सुंदर असले पाहिजेत हे पौगंडावस्थेतील विद्यार्थांना सांगण्याऐवजी गुरुजी आपली अवैज्ञानिक मतं त्यांच्या माथी मारत नाहीत काय? त्यांच्या मनात स्त्रियांविषयी तिरस्कार का निर्माण करीत आहेत?

लैंगिकता हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. तो कोणाही मानवाला टाळता येत नाही. अट्टाहासाने ब्रम्हचर्य पाळणारे गुरुजी चंद्रकलेवर पहिल्या भेटीतच भाळतात, यात केवळ आणि केवळ दोष चंद्रकलेचाच का? गुरुजींचा यात काहीच का दोष नाही? गुरुजींना त्यांच्या परीनं विवेक पाळता आला नाही, किंवा त्यांना आपण चंद्रकलेच्या प्रेमात पडलो आहोत हे सत्य गावकऱ्यांसमोर ताठ मानेनं कबूल करता आलं नाही ही वस्तुस्थिती दडवून ठेवण्यासाठी अवघ्या स्त्री जातीलाच गुन्हेगार ठरवायचं का? द ब्ल्यू एंजलमध्ये प्रोफेसर राथ लोलासोबत एक रात्र घालवतो, पण त्याला यात काहीच गैर वाटत नाही. अपराधी वाटत नाही. उलट राथ यानंतरच लोलासमोर आपलं प्रेम व्यक्त करतो आणि लोलाला लग्नाची मागणी घालतो.

पिंजरा हा चित्रपट १९७२ सालचा. म्हणजे महात्मा फुल्यानी मुलींची पहिली शाळा काढली त्यानंतर सुमारे १२५ वर्षानंतरचा. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २५ वर्षानंतरचा. पण या आदर्शवादी गुरुजींच्या आदर्श शाळेत एकही मुलगी नाही. त्यांच्या रात्रीच्या प्रौढ शाळेत प्रौढ महिला आहेत. पण दिवसाच्या शाळेत एकही मुलगी का नाही?

गुरुजी तमाशाच्या फडात नाइलाजाने का होईना दाखल होतात. चंद्रकला त्यांना योग्य तो सन्मान आणि प्रेम देऊ करते. पण गुरुजी तमासगीरांच्या सुखदु:खांशी एकरूप होत नाहीत. हातात नोटा धरलेल्या, पुरुषत्वाचा आणि पैशाचा माज असलेल्या पुरुषांसमोर पोट जाळण्यासाठी कामुक आणि सूचक अविर्भाव करीत नृत्य करणाऱ्या चंद्रकला आणि तिच्या सहकारी नर्तिकांबद्दल गुरुजींना ना सहानुभूती वाटते ना कणव! ना त्यांना कामांध पुरुष प्रेक्षकांबद्दल तिरस्कार वाटतो! त्याना राग येतो तो पैसे स्वीकारताना पुरुषांच्या अंगचटीला जावं लागणाऱ्या चंद्रकलेचा! तमासगीर महिलांचं लैंगिक शोषण तर गुरुजींच्या खिजगणतीतही नाही! म्हणजेच साधी किमान माणुसकीही या गुरुजीत नाही. तरीही आपण गुरुजींना आदर्श व्यक्ती समजायचं? केवळ शांतारामबापूंसारखे जेष्ठ दिग्दर्शक सांगतात म्हणून? सारासार विचार न करता?

आता चंद्रकला या व्यक्तिरेखेचाही विचार करूया :

सारेच तमासगीर कलावंत-काही अपवाद बगळता दलित जातीतीलच असतात. तमासगीर महिला तर साऱ्या दलित जातीतीलच असतात. चंद्रकला आणि तिच्या ताफ्यातील इतर महिला कलावंत दलितच आहेत. गावचे पाटील आणि आपले आदर्श गुरुजी गावकऱ्यांना मदतीला घेऊन तमासगीरांची पालं अगदी सहजपणे का उद्‌वस्त करू शकतात, त्यांना गावाबाहेर

का हाकलून देऊ शकतात याची काही संगती लागते का? हे व अशा प्रकारचे प्रश्न द ब्ल्यू एंजलमध्ये येतच नाहीत.

चंद्रकलेच्या तोंडी काही संवाद आहेत : ती म्हणते – जसा एखादा शेतकरी असतो, एखादा कुंभार असतो, तसे आम्ही तमासगीर आहोत. हा आमचा पेशा आहे. हे खरे आहे का? तमाशा हा स्वतंत्र पेशा आहे की, सरंजामी, पुरुषप्रधान समाजानं आणि जातिव्यवस्थेनं दलितांवर विशेषत: दलित महिलांवर स्वत:च्या कामविषयक मनोरंजनासाठी लादलेली सक्ती आहे?

पिंजरा चित्रपटात तमाशा या कलेचं उदात्तीकरण करण्याचा, लावणी आणि अध्यात्म यांची सांगड घालण्याचा प्रयत्नही आहे. या अर्थाचे संवाद परत चंद्रकलेच्याच तोंडी आहेत. साऱ्या ज्ञात-अज्ञात तमासगीर कलावंतांविषयी पूर्ण आदर बाळगून, कदाचित त्यांचा रोष पत्करून, त्यांची क्षमा मागून एक प्रश्न विचारावासा वाटतो की, तमाशा ही कला आहे का? किंवा तमाशा ही सन्माननीय कला आहे का? जर आहे, तर ती केवळ दलित महिलाच सवर्ण पुरुषांसमोर किंवा धनवान पुरुषांसमोरच का सादर करतात? तमाशात महिला प्रेक्षक का नसतात? तमाशातल्या लावण्या नेहमी शृंगारिक, सूचक काही वेळा अश्लीलही का असतात?

आज महाराष्ट्रात उच्चमध्यमवर्गीय समाजात शेकडो मुली भरतनाट्यम वा कथ्यक शिकत असतात. अनेक मुली नृत्यातच करियरही करतात, पदव्या घेतात. त्यांच्यासमोर तमाशा हा करियर ऑप्शन का असत नाही? याचं उत्तर, तमाशा हा पेशा आणि तमाशा ही कला सन्माननीय नाही. आपल्या सख्ख्या नात्यातील कुणी महिला-जसं की बहीण, पत्नी, आई तमाशाच्या बोर्डावर नृत्य करीत आहे आणि चेकाळलेले, बेभान झालेले पुरुष तिच्यावर नोटा उधळत आहेत अशी कल्पना आपण क्षणभर करून पाहू शकू का? तरीही तमाशाचं उदात्तीकरण का केलं जातं? तमासगीरानी तमाशातच समाधान मानावं म्हणून? त्यानी विद्रोहाची भाषा करू नये म्हणून? पंतप्रधान मोदीनी कुंभमेळ्यातील दलित सफाई कर्मचाऱ्यांची पाद्यपूजा करणं आणि उच्चजातीय मंडळीनी तमाशा ही कला जिवंत राहिली पाहिजे, जोपासली गेली पाहिजे असं आवाहन करत राहाणं सारखंच ढोंगीपणाचं नाही काय? तमाशा जिवंत ठेवायची आणि कुंभमेळ्याचा परिसर स्वच्छ ठेवायची जबाबदारी केवळ दलितांचीच का आहे?

थोडक्यात, तमाशा म्हणजे सरंजामी, पुरुषप्रधान समाजानं आणि जातिव्यवस्थेनं चालवलेलं दलित महिलांचं शोषण आणि केवळ शोषण आहे. याला मुलामा हव्या त्या रंगाचा द्या! शिवाय हे शोषण दुहेरी आहे. कुटुंबाबाहेरच्या धनदांडग्या पुरुषांकडून (बहुतेकदा सवर्ण पुरुषच) होणारं लैंगिक शोषण; आणि कुटुंबातील भाऊ, वडील, आजोबा इत्यादींकडून होणारं आर्थिक शोषण.

पिंजरा चित्रपटातील चंद्रकला ही सुद्धा एक शोषित दलित महिलाच आहे. पण ती समोर येते एका उच्चवर्णीय, सत्त्वशील, चारित्र्यवान पुरुषाच्या अधोगतीस कारणीभूत झालेली खलनायिका म्हणून. हे न्यायाचं आहे का? जिचं चहूअंगानं शोषण होतं आहे, तीच खलनायिका? तरीही चंद्रकला आपलं सर्वस्व गुरुजींवर उधळून लावते. गुरुजी तिच्यासाठी काय करतात?

पिंजरा चित्रपटात चंद्रकला आणि तिच्या ताफ्यातील लोकांचं जीवन कसं गोड गोड, छान, स्वच्छंदी, निवांत, समृद्ध, काहीसं रोमँटिकही दाखवलं आहे. हे वास्तवाला धरून आहे का? अब्रूला जपत उघड्या माळावर आयुष्य काढणं इतकं सोपं असतं? गावोगाव फिरणाऱ्या तमासगिरांना दुपारच्या जेवणाची भ्रांत कधीच पडत नसेल? महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील तीव्र जातिभेदाचा जाच तमासगिरांना अजिबात होत नसेल? कसं शक्य आहे?

तमासगिरांचं जगणं आणि सोसणं आपल्यासारख्या शहरी माणसांना अनुभवता येणार नाही, कदाचित.

निदान संदेश भंडारेनी काढलेले तमासगिरांचे फोटो तरी पाहू शकतो? किशोर शांताबाई काळे यांचं कोल्हाट्याचे पोर वाचू शकतो? निखिल वागळेनी घेतलेली सुरेखा पुणेकरांची ग्रेट भेट यू ट्यूबवर पाहू शकतो? किमान माणुसकी- सहानुभूती दाखवू शकतो? पण दुर्दैवाने यातील काहीच घडत नाही. जणू काही ही तमासगीर मंडळी इथली नाहीत, परग्रहावरची आहेत.

प्रश्न का पडत नाहीत?

प्रश्न असंख्य आहेत. बहुआयामी आणि गुंतागुंतीचे आहेत. अडचण ही आहे की, आपल्याला प्रश्नच पडत नाहीत. आपण इतके असंवेदनशील आणि निबर का बनलो आहोत?

आपल्या मेंदूचा ताबा आजही क्रूर, विषमतावादी, दलित आणि स्त्रियांना जनावरापेक्षा अधिक किंमत न देणाऱ्या मनुस्मृतीपाशीच आहे का? पुरुषसत्ताक, सरंजामी, सनातनी, जातिभेदानं पोखरलेला आपला समाज नैसर्गिकच आहे, यात कोणताच अन्याय नाही हे आपल्या अंतर्मनात, नेणिवेत आजही बिंबलेलं आहे का? पिंजरा चित्रपटाशी संबंधित व्ही. शांताराम, शंकर पाटील, अनंत माने, राम कदम ही सारी मंडळी बहुजन समाजातीलच आहेत-पण स्त्रीकडे पाहायचा त्यांचा दृष्टिकोन इतका बुरसट, दुष्ट, सनातनी आणि मनुवादी का? हे सारे मुळातलेच मनुवादी होते असे मानायचे की, यांची मने, बुद्धी, संवेदना, जाणिवा, नेणिवा सारे कांही मनुशरण झाले होते असे समजायचे?

व्ही. शांताराम यानी पिंजरा चित्रपटाची निर्मिती केली १९७२ साली. डॉ. श्रीराम लागू यानी आपले आत्मचरित्र लमाण लिहिले २००६ साली, अतुल पेठे यानी पिंजरा चित्रपटावर साधना साप्ताहिकात लेख लिहिला २०१३ साली, गणेश मतकरी यानी पिंजराची समीक्षा केली २०१६ साली! चार दशकाहून अधिक काळ लोटला, पण आपण किती बदललो?

सवाल हा आहे की, अजून किती दिवस आपण सारे त्याच सरंजामी, पुरुषसत्ताक, सनातनी, ब्राह्मणी, मनुवादी, दृष्टिकोनातून आपली संस्कृती, आपले साहित्य, संस्कृती, इतिहास, कला, चित्रपट, समाज, परंपरा, धर्म, अध्यात्म इत्यादीकडे पाहाणार आहोत? या चक्रव्यूहातून आपण कधी बाहेर पडणार आहोत की नाही?

पिंजरा चित्रपटाची एका वेगळ्या दृष्टिकोनातून केलेली ही समीक्षा हे एक निमित्त होतं - हे प्रश्न विचारण्यासाठी! ●

संदर्भ:

पिंजरा चित्रपट - विकिपिडिया

लमाण (आत्मचरित्र) - डॉ. श्रीराम लागू

पिंजरा (लेख - साधना-ऑगष्ट, २०१३) - अतुल पेठे

पिंजरा (चित्रपट समीक्षा - पुणे मिरर, १८.०३.२०१६) - गणेश मतकरी

कोल्हाट्याचं पोर - किशोर शांताबाई काळे

ग्रेट भेट (यू ट्यूब - सुरेखा पुणेकर)- निखिल वागळे

घुंगरांच्या वेदनेचे गाणे, वेदनांकित घुंगरांचे संदर्भ-आनंद विंगकर या कवी महादेव कांबळे यांच्या कवितासंग्रहाची समीक्षा, दिव्य मराठी, दिनांक १६.१२.२०१८

With Best Compliments From:

Commercial Offset Printers

PRATIBHA

P r i n t e r s

Datta Digambar Colony, Near Varje Naka,
Pune 411 052
☎ 2544 99 09, 2448 00 92

- ♥ Graphics Designing
- ♥ D.T.P.
- ♥ Scanning
- ♥ Perfect Binding
- ♥ Section Sewing
- ♥ All type of Calendar Makers